स्पेशल दिवाणी दावा क्र.२४/२०११
नि.क्र.२०२/ क (सोबत)

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१</u>**

**<u>उलटतपास वादीतर्फे वकील श्री. जे.व्ही. धुमाळ यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. पांडुरंगच्या नावे सर्वे नं.९अ मधील क्षेत्र ६ हेक्टर १२ पैकी ९५ आर इतकी जमीन वजा करुन उर्वरीत जमीन त्यांच्या वडीलांकडून वारसाआधारे अंदाजे सन १९८५-८६ आली होती. मी ज्यावेळी पांडुरंगकडून खरेदीखत करुन घेतले त्यावेळी पांडुरंग एकटाचा जमिनीचा मालक नव्हता. त्यावेळी मी सदर जमिनीचा ७/१२ पाहूनच व्यवहार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदीखत करुन घेतले त्यावेळी ७/१२ उताऱ्यावर कलुबाई, सुकूमारबाई व पांडुरंग यांची सामाईक नावे होती. खरेदीखताच्यावेळी खरेदीखतावर त्यांची कलुबाई व सुकूमारबाई यांची संमत्ती घेतली नाही. माझे खरेदीखत पांडुरंगचा अविभक्त हिस्सा म्हणून झालेली नाही. खरेदीखतामध्ये संपूर्ण जमिनीचा तसेच ८२ आर जमीन असे दोन्हीच्या चतुःसीमा नमूद केलेल्या आहेत. मी खरेदीखत पाहिलेले आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, खरेदीखतावर फक्त ८२ आर जमिनीच्या चतुःसीमा नमूद केल्या आहेत. खरेदीखतापुर्वी लेखी ठरावपत्र झालेले नव्हते. खरेदीखतापुर्वी इतर लेखी कागद लिहून ठेवण्यात आले होते. सदर कागद मी दाव्यात दाखल केलेले नाही. जमिनीचा मावेजा तीन लाख प्रति एकर असा ठरला होता. सदर जमिनीचा मावेजा मी खरेदीखतापुर्वीच दिला होता. मला जमिनीचा मावेजा दिल्याची तारीख सांगता येत नाही. खरेदीखतामध्ये मावेजा रु.२९,००,०००/- व काही रक्कम नमूद आहे. मावेजाची रक्कम मी बॅकेतून काढल्याचे दर्शवणारा पुरावा माझ्याकडे नाही. मावेजा रक्कम दिल्यानंतर मी पांडुरंगकडून रशिद पावती घेतली होती. सदर रशिद पावती मी दाव्यात दाखल केली नाही. मावेजा रक्कम मी पांडुरंग यांनाच दिली होती, त्यांच्या बहिणींना नाही. खरेदीखतामध्ये पूर्ण मावेजा दिल्याचे नमूद आहे. सदर मावेजा कोणत्या तारखेला दिला होता हे खरेदीखतामध्ये नमूद आहे किंवा नाही हे मला आठवत नाही. ८२ आर जमिनीचा ताबा खरेदीखतापुर्वी दिल्याबाबत खरेदीखतामध्ये नमूद आहे, परंतु त्यामध्ये ताब्याची तारीख नमूद नाही. ताबा दिल्यासंदर्भात मी ताबा पावती करुन घेतलेली नाही.

२. खरेदीखतापुर्वी जमिनीसंदर्भात मी कायदेशीर सर्व चौकशी केली होती. सदर जमीन पांडुरंगने कर्ज फेडण्यासाठी व सोयीची जमीन असल्यामुळे विक्री केली होती. पांडुरंगला कोणाचे कर्ज झाले होते व ते कोठे जमीन घेणार होते हे मला माहीत नाही. जमीन विक्रीचे कारण खरेदीखतामध्ये नमूद आहे किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पांडुरंग जमीन सर्वे नं.९अ चा एकटाच मालक नसल्यामुळे त्याला जमीन विक्री करण्याचा कोणताही अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतापुर्वी जमिनीचा मावेजा मी पांडुरंगला दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पांडुरंगकडून नाममात्र करुन खरेदीखत करुन घेतले आहे तसेच मला जमिनीचा ताबाही मिळालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन सामाईक असल्यामुळे व जमिनीच्या चतुःसीमा खरेदीखतात नमूद न केल्यामुळे सदर खरेदीखत बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतातील नमूद जमिनीचा ताबा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीचा ताबा हा वादीकडे आहे.

**वादीचे विधीज्ञ यांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकुब.**

दि.१७/१२/२०२४

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

<u>**आज प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ हजर**</u>

<u>**पुढील उलटतपास वादीतर्फे वकील श्री. जे.व्ही. धुमाळ यांचेमार्फत शपथेवर सुरु.**</u>

**प्रश्नः** सर्वे नं.९ए मधील क्षेत्र प्रतिवादी क्र.१ च्या नावे ३ हे. ३३ आर २००४ साली अस्तीत्वात नव्हती हे तुम्ही कशाच्या आधारे सांगत आहात?
**उत्तरः** आम्ही तहसीलदारकडे अर्ज दिला, तेव्हा त्यांनी पांडुरंग घाडगे यांच्या नावे ३ हे. ३३ आर जमीन केव्हा होती व २००४ पासून कसा बदल झाला यासंदर्भात अर्ज दिला. त्यानुसार तहसीलदार यांनी ३ हे. ३३ आर जमीन प्रतिवादी क्र.१ च्या नावे १५/०७/२०१० रोजी फेर क्र.१०७६ रद्द होऊन आल्याचे सांगितले.

३. सदर तहसीलदारचा रिपोर्ट मी प्रकरणात दाखल केले आहे. सदर रिपोर्टला **नि.क्र........** देण्यात येत आहे.

**प्रश्नः** दि.०३/०२/२०२४ रोजी तुमच्यात व प्रतिवादी क्र.१ मध्ये रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर तडजोड पत्र लिहण्यात आले होते का?
**उत्तरः** होय.

हे म्हणणे खरे आहे की, सदर तडजोडपत्राआधारे दि.१७/११/२००० रोजी नोंदणीकृत कौटुंबिक वाटणीपत्र झाले व त्यानुसार सर्वे नं.९अ मधील ३ हे. ७४ आर जमीन प्रतिवादी क्र.१ च्या हिश्यास आलेली आहे.

**प्रश्नः** तुमच्या सरतपासातील परिच्छेद क्र.३ मध्ये तुम्ही पांडुरंगकडून ३ हे. ७९.३ आर जमीन विकत घेतल्याचे नमूद आहे. त्याअनुषंगाने तुमच्या दोघांमध्ये कोणता ठराव झाला होता का?

**उत्तरः** प्रतिवादी यांनी दिवाणी दावा क्र.१२/१२ पांडुरंग वि. अफसर माझ्याविरुध्द दाखल केला होता, त्यामध्ये मी प्रति दावा दाखल केला होता. सदर दावा पांडुरंगने माझा प्रति दावा मान्य करुन विना अट काढून घेतला. सन २०१२ पुर्वी मी पांडुरंगविरुध्द सदर प्रकरणाव्यतिरिक्त् कोणतीही केस दाखल केली नाही. आता मला जे खरेदीखत दाखविण्यात आले, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यास **नि.क्र..........** देण्यात येते.
**प्रश्नः** सदर खरेदीखतामध्ये ८२ आर जी विक्री केली आहे त्याचा चतुःसीमेमध्ये उल्लेख आहे काय?
**उत्तरः** चतुःसीमेमध्ये उल्लेख नसून खरेतीखतामध्ये त्याबाबत उल्लेख केलेले आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेतीखतामध्ये “"मी यापुर्वी सदर जमिनीचे गहाणखत, बक्षीस व विक्री करणेबाबतचा ठराव करुन दिलेला नाही” असा लिहीलेला मजकूर बरोबर आहे. मला वि. दिवाणी दावा क्र.९/२००५ बाबत आठवत नाही. सदर प्रकरणामध्ये सदर ८२ आर जमिनीसंदर्भात स्थगितीचा आदेश पारीत करण्यात आलेला नव्हता. पांडुरंगने सुनील माने यांच्या हक्कात जे ठरावपत्र नि.क्र.९० करुन दिले होते त्यावर मी साक्षीदार नव्हतो व त्यावेळी मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठरावपत्रात काय नमूद आहे हे मला माहीत नाही. साक्षीदार सांगतो की, परंतु सदरचा स्टॅम्प बोगस आहे. सदर ठरावाबाबत मला सदर प्रकरणातील समन्स प्राप्त झाल्यानंतर माहिती झाली. नि.क्र.९० वरील ठराव बोगस असल्याबाबत मी माझे म्हणणेमध्ये उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठराव

रद्दबातल व्हावा म्हणून मी कार्यवाही केली नाही. दि.दावा क्र.१२/१२ मध्ये मी प्रति दावा दाखल करुन त्याबाबत दाद मागितली आहे. सदर दाव्याच्या प्रती मी दाखल करु शकतो. मी स्टॅम्प विक्रेते के. एस. पाटील यांना ओळखतो. मी त्यांच्याकडून स्टॅम्प घेतलेले आहे. त्यांची व माझी ओळख कधीपासून आहे हे मला आठवत नाही. माझे व त्यांचे किती वर्षापुर्वी झाली होती हे मला आठवत नाही. माझे त्यांचेशी बोलणे चालणे नेहमी होत नसते. मी त्यांच्या गावाला गेलेलो नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, पांडुरंगने माझ्या हक्कात करुन दिलेल्या बयनाम्यास बाधा उत्पन्न निर्माण होत आहे म्हणून सदर स्टॅम्प बोगस असल्याचे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा स्टॅम्प खोटा आहे असे म्हणण्याचा मला कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, ठरावपत्रात नमूद असलेल्या जमिनीमध्ये माझा कोणताही हक्क संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी के. एस. पाटील यांच्यावर मी दबाव आणून खोटे शपथपत्र करुन त्याचाही साक्षीदार म्हणून जबाब घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दावा दाखल झाल्यानंतर स्टॅम्प खोटा असल्याबाबत मी वादीविरुध्द खोट्या फिर्यादी दाखल केल्या आहेत. साक्षीदार सांगतो की, सदर प्रकरणात दाखल केलेले काही कोर्ट फिस स्टॅम्प खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सुनील व पांडुरंग यांच्यामध्ये ठरावपत्र झालेले असताना मी सदरचा खोटे खरेदीखत करुन घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताप्रमाणे पांडुरंगने मला कोणताही ताबा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ठरावपत्राआधारे संपूर्ण ३ हे. ३३ आर क्षेत्रावर वादीचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत
(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

दि.०७/०१/२०२५